


दैनिक

अचूक वेध, अचूक बातमी

# अक्षराज

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

Email : newsaksharaj2021@gmail.com

**आजचा सुविचार**

अगदी सरळमार्गी असणे
हेही एक प्रकारचे पापच आहे...
हे पाप कालांतराने मनुष्याच्या
दुर्बलतेचे कारण बनते...
- स्वामी विवेकानंद

वर्ष : ०५ | अंक : ७८, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, शनिवार, दि.०१ नोव्हेंबर २०२५ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

## अंगणवाडी सेविकेचा मुलगा बनला राज्यातील अव्वल अधिकारी



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.३१, इचलकरंजी :** वस्त्रनगरी इचलकरंजीतील बोने माळ भागात राहणारा तन्मय मांडरेकर आज प्रेरणादायी नाव ठरत आहे. घरची आर्थिक हालाखी, बालवयात वडिलांचं छत्र हरवलेलं, मात्र शिक्षणाची ओढ आणि कणखर आईचं पाठबळ याच्या जोरावर तन्मयनं महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या राज्यसेवा परीक्षेत ओबीसी प्रवर्गातून राज्यात अव्वल येत अभिमानाचा मान पटकावला आहे. दहा बाय दहाच्या एका खोलीत बसून 'अभ्यासचं एकमेव लक्ष्य' साध्य करणाऱ्या तन्मयने कोणत्याही खासगी मार्गदर्शनाविना क्लासवन अधिकाऱ्याच्या पदापर्यंतचा प्रवास गाठला आहे.

**आई आणि आजीच्या कष्टावर उभं राहिलेलं स्वप्न...**

तन्मयच्या आयुष्याची वाटचाल लहानपणापासूनच संघर्षमय होती. वयाच्या चौथ्या वर्षी वडील अनिल मांडरेकर यांच्या निधनानंतर आई राधिका आणि आजी हौसाबाई यांनी घराचा भार आपल्या खांद्यावर घेतला. घरात उत्पन्नाचं साधन नसताना राधिका यांनी अंगणवाडी सेविकेचं काम स्वीकारून दोन मुलांना शिक्षणासाठी स्वतः ला झोकून दिलं. माझा मुलगा अधिकारी व्हावा, हेच स्वप्न होतं. तेच स्वप्न आता साकार झालं आहे, असे भावनिक उद्गार त्यांनी व्यक्त केले आहेत.

**प्रत्येक वर्गात पहिल्या क्रमांकावर...**

तन्मयने शिक्षणात नेहमीच अव्वल क्रमांक मिळवत प्रगती केली आहे. दहावीत ९८ टक्के गुण मिळवत तन्मय विभागात पहिला आला आणि बारावीनंतर पुण्यातील सीओइपी महाविद्यालयातून सिव्हिल इंजिनिअरिंगची पदवी घेतली. या प्रवासात तो सदैव अभ्यासात गुंतलेला राहिला. २०२२ मध्ये त्याने स्पर्धा परीक्षेची तयारी सुरू केली आणि पूर्वतयारीसाठी वृत्तपत्रांचा सखोल अभ्यास हा त्याचा दैनंदिन भाग असायचा. पहिल्याच प्रयत्नात २०२३ मध्ये राज्यसेवेच्या गटविकास अधिकारी पदावर तो पात्र ठरला, तर २०२४ च्या निकालात राज्यात प्रथम येण्याचं स्वप्न त्यांनं साकार केलं आहे.

**बालपणीच कष्टाचे धडे...**

घर चालविण्यासाठी तन्मयनं दहावीच्या सुट्टीत स्थानकावर पेन विकण्याचंही काम केलं आहे. लहानपणीच जीवनात कठोर परिश्रमाची शिकवण घेतलेला हा तरुण आज संपूर्ण कोल्हापूर विभागासाठी प्रेरणास्थान ठरला आहे. त्याने नेहमी वाचनाची सवय ठेवली आणि प्रत्येक गोष्टीत शिकण्याची आवड दाखवली, असा अभिमान त्याचे मामा अभिजीत साळुंखे व्यक्त करतात.

**प्रयत्नांतून यशाकडे वाटचाल...**

कोणत्याही गोष्टीत अपयश हे पचवता आलं पाहिजे. अपयशानंतर पुन्हा नव्याने प्रयत्न करुन यश खेचून आणता येते, अशा भावना व्यक्त करणारा तन्मय सध्या पुण्यातील यशदा संस्थेत गटविकास अधिकारी पदाचं प्रशिक्षण घेत आहे. त्याची बहीण रेवती माने शाहुवाडीत जिल्हा परिषदेत प्राथमिक शिक्षिका म्हणून काम पाहते. दरम्यान, प्रतिकूल परिस्थितीतून उभे राहून मिळवलेल्या या चमकदार यशामुळे तन्मय मांडरेकरवर इचलकरंजीसह कोल्हापूर जिल्ह्यातून त्याच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे. या यशामागे असलेली आईची जिद्द आणि मुलाची मेहनत भावी पिढ्यांसाठी प्रेरणादायी आणि आदर्श ठरत आहे.

## मृत्यूदर कमी करण्यासाठी उपाययोजना करा

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.३१, मुंबई :** राज्यातील शासकीय रुग्णालयातील मृत्यूदर कमी करण्यासाठी तातडीने उपाययोजना कराव्यात असे निर्देश वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांनी दिले. सेंट जॉर्ज रुग्णालयात मृत्यूदर वाढीची वैद्यकीय शिक्षण मंत्री मुश्रीफ यांनी गांभीर्याने दखल घेऊन याविषयी तातडीच्या बैठकीचे आयोजन केले. यावेळी वैद्यकीय शिक्षण विभागाचे सचिव धीरज कुमार, संचालक डॉ. अजय चंदनवाले, जे.जे. रुग्णालय आणि सेंट जॉर्ज रुग्णालयाचे अधिष्ठाता आणि वैद्यकीय अधीक्षक आदींसह संबंधित अधिकारी उपस्थित होते.

वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ म्हणाले की, शासकीय रुग्णालयातील मृत्यूदर कमी करण्यासाठी रुग्णालयात वैद्यकीय सेवेत तत्काळ सुधारणा घडवून आणण्यासाठी आवश्यक मनुष्यबळ, निधी आणि उपकरणांची उपलब्धता प्राधान्याने सुनिश्चित करावी. अतीदक्षता विभागातील खाटांची संख्या, मनुष्यबळ वाढविणे, औषधे व आधुनिक उपकरणे पुरविणे आणि दीर्घकालीन सुधारणा आराखडा तयार करण्याचेही त्यांनी निर्देश दिले. अनेक रुग्ण खासगी रुग्णालयातून शेवटच्या टप्प्यात शासकीय रुग्णालयात स्थलांतरित होत असल्यानेही आयसीयूतील मृत्यूदर तुलनेने अधिक दिसत असल्याचे स्पष्ट करण्यात आले असल्याचे मुश्रीफ यांनी सांगितले.

२०२२ ते २०२५ दरम्यान एकूण मृत्यूदरात सातत्याने घट होत आहे. २०२२ मध्ये २०४० रुग्ण तर २०२५ मध्ये ७४०७ रुग्ण यशस्वीरीत्या उपचारानंतर घरी परतले.

यासंदर्भात वैद्यकीय शिक्षण विभागाने तातडीने कार्यवाही करत पारदर्शक चौकशी आणि मजबुत सुधारणा आराखडा आखला आहे. रुग्णालयातील सेवांची गुणवत्ता वाढण्यासाठी ठोस उपाययोजना अमलात आणण्यात येत आहेत.

**तत्काळ उपाययोजना...**

१. 'आयसीयू'मध्ये आवश्यक तज्ज्ञ वैद्यकीय अधिकारी व महत्त्वाची औषधे तातडीने उपलब्ध करून देण्याचे निर्देश
२. अतिगंभीर रुग्णांना आवश्यकतेनुसार सर जे.जे. रुग्णालयात सुसज्ज रुग्णवाहिकेतून स्थलांतर करण्याच्या सूचना

# शेतकऱ्यांना ३० जूनपर्यंत कर्जमाफी, आंदोलनाला मोठं यश

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.३१, अहिल्यानगर :** कर्जमुक्ती, शेतमालाला हमीभाव, दिव्यांगांना सहा हजार रुपयांचे मानधन, तसेच मेंढपाळ आणि मच्छीमारांच्या न्याय हक्कांसाठी प्रहार संघटनेचे अध्यक्ष बच्चू कडू यांनी नागपूर येथे आंदोलन पुकारले होते. तसेच शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसह विविध मागण्यांना घेऊन बच्चू कडू हे चांगलेच आक्रमक झाले होते. बच्चू कडूंच्या नेतृत्वात राज्यभरातील शेतकरी आणि प्रहार कार्यकर्त्यांनी नागपुरात मंगळवारपासून चक्काजाम आंदोलन सुरू केलं होते.

या आंदोलनाला भूमिपुत्र शेतकरी संघटनेचे संस्थापक संतोष वाडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली शेकडो भूमि पुत्र आंदोलनात सहभागी झाले होते. आंदोलनाची तीव्रता बघता सरकारने आंदोलनाची दखल घेत सह्याद्री अतिथीगृह येथे शेतकरी कर्जमाफी संदर्भात आंदोलक प्रतिनिधी शिष्टमंडळ सोबत मुख्यमंत्री फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेतली. यावेळी राज्यातील शेतकऱ्यांना ३० जून २०२६ पूर्वी कर्जमाफीचा निर्णय घेणार अशी



**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले...**

- कर्जमाफी कशी करायची याबाबत एप्रिलपर्यंत समिती शिफारस करेल...
- शिफारशीच्या आधारावर पुढच्या तीन महिन्यात म्हणजे
- ३० जून २०२६ पर्यंत कर्जमाफी करणार...
- नैसर्गिक आपत्तीमुळे संकटात असलेल्या शेतकऱ्यांच्या खात्यात आता पैसे देणे आवश्यक
- रब्बीची पेरणी करता यावी, म्हणून आता ३३,००० कोटींच्या पॅकेज वितरणास प्राधान्य
- विविध विषयांवर पुढच्या आठवड्यात बैठक घेणार...

घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गुरुवारी रात्री केली असून या आंदोलनाला मोठं यश मिळाल असल्याची माहिती भूमिपुत्र शेतकरी संघटनेचे संस्थापक संतोष वाडेकर यांनी दिलीय. तसेच कर्जमाफीच्या अनुषंगाने एक समिती आम्ही गठीत केली आहे. एप्रिलपर्यंत या समितीने शिफारस करायची आहेत. त्या आधारावर पुढची प्रक्रिया करून तीन महिन्यात म्हणजे ३० जून २०२६ पर्यंत कर्जमाफी करण्यात येईल असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जाहीर केले.

सह्याद्री अतिथीगृह येथे शेतकरी कर्जमाफी संदर्भात आंदोलक प्रतिनिधी शिष्टमंडळ सोबत मुख्यमंत्री फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. या बैठकीस उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, मंत्री दत्तामामा भरणे, मंत्री गिरीश महाजन, मंत्री जयकुमार रावल, राज्यमंत्री ॲड आशिष जयस्वाल, राज्यमंत्री डॉ पंकज भोयर, मुख्य सचिव राजेश कुमार, शेतकरी आंदोलन शिष्टमंडळातील प्रतिनिधी माजी राज्यमंत्री ओमप्रकाश बच्चू कडू, खासदार राजू शेट्टी, माजी मंत्री महादेव जानकर, वामनराव चटप, रविकांत तुपकर, राजन क्षीरसागर, गिरीश दाभाडकर, अजित नवले यांच्यासह सर्व प्रमुख विविध विभागांचे अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव, सचिव आणि आयुक्त, वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

## तळोधी पोलिसांची अवैध गोवंश वाहतुक करणाऱ्यांवर कारवाई !

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.३१, चंद्रपूर :** तळोधी पोलिसांनी केलेल्या एका महत्वपूर्ण कारवाईत, मौजा बाळापूर रेल्वे गेटजवळ गोवंश जनावरांची अवैध वाहतुक करणारा एक आयशर ट्रक जप्त करण्यैत आला आहे. मात्र, पोलिसांना पाहताच ट्रकचा अज्ञात चालक वाहन रस्त्यावर उभे करुन जंगलात पळून जाण्यात यशस्वी झाला. यै प्रकरणी अज्ञात आरोपीविरुध्द महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम १९७६ आणि प्राण्यांना निर्दयतेने वागविणे प्रतिबंध अधिनियम १९६० अंतर्गत गुन्हा दाखल करण्यैत आला आहे.

दि. ३१/१०/२०२५ रोजी पहाटे २.३० ते ३.३० वैजण्याच्या सुमारास, पोलीस स्टेशन तळोधीच्या हद्दीतील मौजा बाळापूर रेल्वे गेटजवळ पोलिसांनी पंचासह नाकेबंदी केली होती. याच दरम्यान, मुकबिराकडून मिळालेल्या खात्रीशिर माहितीच्या आधारे पोलिसांनी केशरी रंगाच्या आयशर कंपनीच्या (क्र. टीजी १२ टी ४०७७) ट्रकवर लक्ष केंद्रित केले. पोलिसांना पाहताच, ट्रकचा अज्ञात चालक आपले वाहन रस्त्यावर उभे करुन तातडीने



जंगलात पळून गेला. पोलिसांनी आरोपीचा शोध घेतला, परंतू तो मिळून आला नाही. पोलीस स्टाफने पंचाच्या समक्ष वाहनाची पाहणी केली असता, ट्रकमधील लोखंडी डाल्यात एकूण ३० नग गोवंश जनावरे आढळून आली. ज्यांची किंमत अंदाजे रु. २,४५, ००० /- आहे.

यासोबतच, अवैध वाहतुकीसाठी वापरलेला केशरी रंगाचा जुना आयशर प्रो. १११४/पी मॉडेलचा ट्रक (क्र. टीजी १२ टी ४०७७) देखील जप्त करण्यात आला, ज्याची किंमत अंदाजे किंमत १०,००,००० लाख रुपये आहे. या संपूर्ण कारवाईत पोलिसांनी एकूण रु. १२,४५,००० /- किंमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. पंचासमक्ष पंचनामा आणि जप्तीची कारवाई पूर्ण करुन अज्ञात आरोपींविरुध्द पोलीस स्टेशन तळोधी येथे गुन्हा क्रमांक १७१/ २०२५ दाखल करण्यात आला आहे. सदरची प्रभावी कारवाई पोलीस अधीक्षक मुमक्का सुदर्शन, अप्पर पोलीस अधीक्षक ईश्वर कातकडे आणि उपविभागीय पोलीस अधिकारी ब्रम्हपूरी रॅकेश जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली.

पोलीस स्टेशन तळोधीचे ठाणेदार सपोनि राहुल गुहे यांच्या नेतृत्वात पोउपनि किशोर मानकर, पोहवा सचिन साखरकर ( २४८८), पोअ अजय निखाडे (४९४), आणि चापोअ सोनल पोपटे (६०३६), यांनी ही कारवाई यशस्वी केली. सध्या या गुन्ह्याचा पिढील तपास पोउपनि किशोर मानकर, पोलीस स्टेशन तळोधी हे करत आहे. पळून गेलेल्या आरोपींचा शोध पोलीस घेत आहेत.

## आशियातील सर्वात मोठ्या लासलगाव बाजार समितीस फ्रान्सच्या शिष्टमंडळाची भेट

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.३१, विंचूर (नाशिक) :** आशिया खंडातील सर्वात मोठी कृषी उत्पन्न बाजार समिती म्हणून ओळख असलेल्या लासलगाव बाजार समितीस फ्रान्समधील नागरिकांच्या एका उच्चस्तरीय शिष्टमंडळाने सदिच्छा भेट देत बाजारपेठेची पाहणी केली.

शिष्टमंडळातील प्रतिनिधींनी कांदा लिलाव प्रक्रिया, वजनमाप, ग्रेडिंग, पॅकिंग, लोडिंग यासह संपूर्ण व्यापार पद्धतीची सविस्तर माहिती घेतली. तसेच सध्या कांद्यास मिळत असलेले बाजारभाव, शेतकऱ्यांना भेडसावणाऱ्या समस्या व आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील संधी यावर त्यांनी शेतकरी, पदाधिकारी व व्यापाऱ्यांशी संवाद साधला.

कांदा लिलाव प्रक्रियेचे प्रत्यक्ष निरीक्षण करताना बाजारभाव ठरविण्याची पद्धत, प्रथम व अंतिम बोली,




हंगामी आवक, शेतमालाच्या वाहतूक व्यवस्थेसह विविध नियमांची माहिती शिष्टमंडळाने जाणून घेतली. कांदा उत्पादनाचे अर्थकारण व जागतिक बाजारपेठेसंदर्भातही शिष्टमंडळाने विशेष रस दाखवून माहितीची देवाणघेवाण केली.

या शिष्टमंडळात कॅथरीन, मेरीलाइन, फिलिप, ॲनी, डोरिस, इसाबेल, थियरी, मार्टिन, मेरी, हर्वे, बेनेडिक्ट, ह्युबर्ट, ॲलेक्स, निकोल यांसह विवेक व मनोज जगताप आदींचा समावेश होता.

यावेळी मुंबई व लासलगाव बाजार समितीचे संचालक जयदत्त होळकर, उपसभापती संदीप (ललित) दरेकर, सदस्य सचिव नरेंद्र वाढवणे, सहसचिव प्रकाश कुमावत, पंकज होळकर आदी मान्यवरांनी पाहुण्यांचे स्वागत केले. बाजार समितीच्या वतीने भारतीय परंपरेनुसार टोपी, उपरणे व पुष्पगुच्छ देऊन शिष्टमंडळाचा सत्कार करण्यात आला.

आंतरराष्ट्रीय स्तरावर लासलगाव बाजारपेठेची वाढती प्रतिष्ठा ही शेतकऱ्यांसाठी महत्त्वाची असून या भेटीमुळे भारतीय कृषीव्यवस्था, शेतकरी बांधवांची परिस्थिती व भारतीय शेतमालाच्या जागतिक संधींसंदर्भात परदेशी नागरिकांना योग्य माहिती मिळाली.

## राज्यसेवा परीक्षेत कोल्हापुरची सायली भोसले चमकली; राज्यात दुसरा क्रमांक

**दि.३१, कोल्हापूर :** महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने (एमपीएससी) घेतलेल्या राज्यसेवा मुख्य परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला. कोल्हापूरने या यशात आपला झेंडा फडकवला आहे. कसबा बावड्यातील सायली किरण भोसले हिने अनुसूचित जाती प्रवर्गातील मुलींमधून राज्यात दुसरा क्रमांक पटकावला आहे. तिची



निवड राजपत्रित वर्ग १ अधिकाऱ्यांमध्ये झाली असून पोलीस उपअधीक्षक पदाला प्राधान्य देणार असल्याचं सायलीने मनाशी पक्कं केलंय. कोल्हापुरचा मान वाढवणारे हे यश तिच्या सातत्यपूर्ण परिश्रम, दृढ निश्चय आणि आत्मविश्वासाचे फलित ठरले आहे.

**एमपीएससीच्या निकालात**

**सायलीचा डंका...**

२०२४ च्या राज्यसेवा मुख्य परीक्षेसाठी राज्यभरातून तब्बल १,५१६ उमेदवारांनी पात्रता मिळवून मुलाखती दिल्या होत्या. या उमेदवारांमधून ३० ऑक्टोबर रोजी आयोगाने अंतिम निकाल प्रसिद्ध केला. सोलापूरचे विजय लमकणे राज्यात पहिल्या क्रमांकावर तर सायली भोसलेने अनुसूचित जातीतील मुलींमध्ये दुसरा क्रमांक मिळवून स्वतः चे नाव सुवर्णअक्षरांनी कोरले आहे.

अक्षराज






## निसर्गाची लहरीपणा...

माणसांप्रमाणे निसर्ग देखील बदलला आहे असे वाक्य हल्ली सर्वांच्या तोंडी ऐकायला मिळते आणि ते खरेही आहे कारण सध्या निसर्गाचा लहरीपणा वाढत चालला आहे. निसर्गाच्या लहरीपणाचा अभ्यास करणारे हवामान खातेही निसर्गापुढे हतबल ठरत आहे कारण हवामानासंबंधीचा अंदाज बांधणे त्यांनाही कठीण होत आहे. पुर्वी ज्याप्रमाणे हवामान होते तसे हवामान आता राहिले नाही. सध्या सतत हवामान बदलत असते. निसर्गाचा लहरीपणा वाढला आहे. उन्हाळा, पावसाळा आणि हिवाळा या तीन ऋतूत जसे हवामान होते तसे आता राहिले नाही. जून ते सप्टेंबर हे चार महिने पावसाचे असतात मात्र गेल्या काही वर्षात आपल्या देशात वर्षभर पाऊस पडतो असे म्हटले तर वावगे ठरणार नाही कारण वर्षभर कोठेना कोठे अवकाळी पाऊस, गारा तसेच चक्रीवादळे होतच असतात. आताही पहा ना नोव्हेंबर महिना सुरू झाला तरी पावसाने विश्रांती घेतली नाही. नोव्हेंबर महिन्यातही राज्यातील अनेक भागात पाऊस सुरू आहे. आंध्रप्रदेश आणि ओडिशाच्या समुद्र किनाऱ्यावर मोंथा नावाचे चक्रीवादळ धडकले आहे. या चक्रीवादळाने राज्यातच नाही तर देशात मुसळधार पावसाचा अदाज वर्तवला जात आहे. सहा महिने झाले तरी पाऊस थांबायचे नाव घेत नाही. पावसाळाच नाही तर उन्हाळा आणि हिवाळ्याचीही तीच गत आहे. उन्हाळ्यात तर तापमान ४० अंशाच्या पुढे जाते पूर्वी उन्हाळ्यात सरासरी तापमान ३५ ते ३८ अंशाच्या दरम्यान असायचे ते आता ४० अंशावर गेले आहेत. अलीकडे ऋतुमान बदलत आहे कोणत्याच ऋतूची सुरवात वेळेवर होत नाही उन्हाळा, पावसाळा, हिवाळा असे तिन्ही ऋतू उशिराच सुरू होतात. आता हेच पहा नोव्हेंबर महिन्यात पूर्वी कडाक्याची थंडी पडत असे आता मात्र नोव्हेंबर महिना उजाडूनही थंडीचा साधा लवलेशही नाही. जून मध्ये येणारा पाऊस जुलै संपत आला तरी दडी मारतो आणि आला तर असा येतो की दोन दिवसात दोन दिवसांची सरासरी भरून काढतो. मात्र अशाप्रकारच्या पावसाची आपल्याला गरज नसते कारण या पावसाने आपले नुकसानच होते. निसर्गाच्या या अवकृपेचे संकट केवळ आपल्या देशातच नाही तर संपूर्ण जगावर आले आहे. अर्थात या बदलत्या हवामानाला आणि निसर्गाच्या लहरीपणास ग्लोबल वॉर्मिंगला जबाबदार धरले जात आहे. ग्लोबल वॉर्मिंगमुळे पृथ्वीचे तापमान वाढत आहे. ग्लोबल वॉर्मिंग म्हणजे पृथ्वीवरील तापमानात होणारी वाढ. जेंव्हा पृथ्वीवरील सरासरी तापमान वाढते तेंव्हा ग्लोबल वॉमिंगची समस्या उदभवते. ग्लोबल वॉर्मिंगची समस्या दिवसेंदिवस वाढत जाईल असा इशारा जागतिक हवामान खात्याने दिला आहे त्यामुळे यापुढे हवामानात बदल हे होतच राहणार आणि त्यामुळे निसर्गाचा लहिरपणा देखील वाढणार आणि तीच चिंतेची बाब आहे अर्थात हवामानातील बदल आणि त्यामुळे होणारी निसर्गाची अवकृपा ही केवळ ग्लोबल वॉर्मिंगमुळे होत आहे असे म्हणणे म्हणजे स्वतःच्या चुकीवर पांघरून घालण्यासारखे आहे. निसर्गातील बदलाला जितके ग्लोबल वॉर्मिंग जबाबदार आहेत तितकेच आपण म्हणजे मानव देखील जबाबदार आहोत. मानवाने निसर्गात हस्तक्षेप केला जंगलतोड करून सिमेंटची जंगले उभारली. बेसुमार वृक्षतोड केली. औद्योगिकरणाच्या नावाखाली कार्बन उत्सर्जन केले. वाहतुकीच्या नावाखाली प्रदूषण वाढवले. निसर्गावर अतिक्रमण करून निसर्गावर अन्याय केला. नदी नाल्यांचा मार्ग बदलला. या सर्व कारणांमुळे पृथ्वीवरील हवामान बदलत आहे. सजीवांना विशेषतः मानवाला जगण्यासाठी प्राणवायूची गरज असते. मात्र मानवाच्या चुकांमुळे स्वार्थामुळे हवेत घातक रसायनांचे आणि प्रदूषणाचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. सतत होणाऱ्या जंगलतोडीमुळे जंगलाखालील एकूण क्षेत्र २० टक्क्यांपेक्षा खाली आले आहे त्याचा मोठा परिणाम हवामान बदलावर झाला आहे. हवामान बदलामुळे निसर्गाचा लहरीपणा वाढला आणि निसर्गाने आपल्यावर अवकृपा करण्यास सुरवात केली. भारत हा कृषिप्रधान देश असून भारतातील ७० टक्के नागरिक शेती आणि त्याला पूरक असणारे व्यवसाय करतात. निसर्गाच्या लहिरपणाचा सर्वाधिक फटका हा शेतकऱ्यांना बसत आहे. बदलत्या हवामानमुळे कोरडा दुष्काळ, ओला दुष्काळ, अवकाळी पाऊस, गारपीट, चक्री वादळे अशा नैसर्गिक आपत्तींना शेतकऱ्यांना तोंड द्यावे लागत आहे त्यामुळे शेतकरी मेटाकुटीला आला आहे. यामुळे अनेकांनी शेती करणेच बंद केले आहे तरुण वर्गाने गाव सोडून थेट शहर गाठले आहे. परिणामी गावे ओसाड होत आहे तर शहरांची लोकसंख्या वाढत आहे. हवामान बदलाचा परिणाम मानवाच्या आरोग्यावर देखील होत आहे. हवामान बदलामुळे श्वसनाचे आणि इतरही आजार वाढत आहे. निसर्गाचा लहरीपणाचा परिणाम केवळ मानवावरच नाही तर पशु पक्षी आणि सजीवांवर देखील होत आहे एकूणच निसर्गाच्या लहरीपणाचा परिणाम संपूर्ण जीवसृष्टीवरच होत आहे. निसर्गाची जर अशीच अवकृपा राहिली तर त्याचा परिणाम केवळ आपल्यालाच नाही तर येणाऱ्या पिढीला देखील भोगावा लागेल म्हणून या बदलत्या हवामानाची आणि त्यामुळे होणाऱ्या निसर्गाच्या अवकृपेची मानवाने गंभीर दखल घ्यायला हवी. हवामान बदलामुळे होणारे गंभीर परिणाम लक्षात घेऊन मानवाने आतापासूनच सकारात्मक पावले उचलायला हवीत. निसर्गाच्या या अवकृपेच्या संकटाकडे जर मानवाने दुर्लक्ष केले तर भविष्यात त्याची मोठी किंमत केवळ आपल्यालाच नाही तर संपुर्ण जीवसृष्टीला चुकवावी लागेल.

# धार्मिक, अध्यात्मिक, वैज्ञानिक, महत्त्व असलेली ।। पापनाशिनी तुळस..।।

हिंदू धर्मात तुळशीला पापनाशिनी म्हणून अनन्यसाधारण महत्व आहे. भारतातील बहुतेक सर्वच भागात येणारी, उगवणारी वनस्पती आहे. बहुतेक हिंदू कुटुंबियात घरासमोर तुळस असते. तुळशी वृंदावन असते.

कार्तिक शुध्द एकादशी पासून ते कार्तिक पौर्णिमा पर्यंत तुळशी विवाह करण्याचा प्रघात आहे. कार्तिक शुध्द एकादशी ते पौर्णिमा असे पाच दिवस ही दिवाळी असते. ह्या प्रबोधिनी एकादशीला श्रीविष्णू झोपेतून जागे होतात, आणि चातुर्मास संपतो. सांगता होते.

तुळशी विवाह म्हणजे तुळस ह्या पवित्र वनस्पतींचे रोपावर शालिग्राम किंवा विष्णू किंवा त्याचाच अवतार श्रीकृष्ण याच्याशी विवाह करण्याची प्रथा आहे.

देवांचे जलंदर दैत्याशी युध्द सुरु होते. त्याची वृंदा नावाची पत्नी पतिव्रता होती. तिच्या पातिव्रत्याच्या प्रभावामुळे मुळे देवा कडून त्याचा वध होत नव्हता. श्रीविष्णूने जलंधराचे रुप घेऊन, तिच्या पातिव्रत्याचा भंग केला. तिच्या पातिव्रत्यावर प्रसन्न होऊन श्रीविष्णूने तिला वर दिला. वृंदा, तू तुळस होऊन सगळ्यांना वंदनीय होशील. तुझ्या तुलसीपत्राने भक्त माझी पूजा करतील. तसेच प्रत्येक कार्तिक मासात तुझा विवाह माझ्याशी लावण्यात येईल.

भगवान विष्णूला तुळस खूप प्रिय आहे. तिला विष्णूप्रियाही म्हणतात. तुळस ही लक्ष्मीचे रुप मानली जाते. तुलसी विवाह हे एक व्रत मानले गेले आहे.हे व्रत केल्याने कन्यादानाचे फळ मिळते असेही मानले जाते. हे एक काम्य व्रत आहे. शास्त्रातही सांगितले आहे, ज्यांना कन्या नसेल त्यांनी एकदातरी तुळशीचा विवाह लाऊन कन्यादानाचे पुण्य प्राप्त करुन घ्यावे. कार्तिकी एकादशी पासून तर त्रिपुरी पौर्णिमेपर्यंत तुलसी विवाह करण्याची प्रथा आहे.

त्रिपुरासुर नावाच्या राक्षसाने खडतर तप करून ब्रह्मदेवाकडून शत्रूंपासून भय राहणार नाही असा वर मागून घेतला होता. वरामुळे उन्मत्त होऊन तो सर्व लोकांना व देवांनासुद्धा खूप त्रास द्यायला लागला. त्रिपुरासुराची तीन नगरे असून त्याला अभेद्य तट होता. त्यामुळे देवांनाही त्याचा पराभव करता येईना. देवांनी भगवान शंकराची अखेर प्रार्थना केली. तेव्हा शंकरांनी त्याची तिन्ही नगरे जाळून त्याला ठार केले. कार्तिक पौर्णिमेच्या दिवशी ही घटना घडल्यामुळे तिला त्रिपुरारी पौर्णिमा म्हणले जाऊ लागले.या दिवशी घरात, घराबाहेर व देवळातही दिव्याची आरास करून पूजा केली जाते तसेच नदीत दीपदान करतात. म्हणजेच नदीपात्रात पाण्यामध्ये दिवे लावून सोडतात. आनंदोत्सव साजरा करतात.

तुलसी विवाह झाल्या नंतर चातुर्मासात जी व्रत, संकल्प केले असतील त्याची समाप्ती करुन ते पदार्थ ब्राम्हणाला दान करून मग सेवन करण्याची पध्दत आहे. तुलसीविवाहा नंतरच विवाह मुहूर्त सुरु होतात.




– दिलीप देशपांडे.
जामनेर. जि.जळगांव.
मोबा. ८९९९५६६९१७

हिंदू परंपरेने नुसार तुळशीच्या केवळ दर्शनाने हजारो गायी दान केल्याचे पुण्य लाभते. तिच्या पानावरचे उदक मस्तकावर धारण केलेतर गंगा स्नानाचे पुण्य लाभते. मरतेवेळी अंगावर तुळशीपत्र असेलतर व्यक्ती वैकुंठास जाते. इतके हिंदू धर्मात तुळशीचे महत्व आहे.

तुळशीचे पान, एक त्रैलोक्य समान, उठोनिया प्रातःकाली, वंदी तुलसी माऊलीनाही आणिक साधन, एक पूजन तुळशीचे न लगेच तिर्थाटना जाणे, नित्य पूजने तुळसीसी योगायोग न लगे काही,तुळशीवाचून देव नाही. अशा शब्दात संत एकनाथ महाराजांनी तुळशीचे श्रेष्ठत्व सांगितले आहे

देवाला नैवेद्य दाखवताना आपण तुळशीच्या पानांचा वापर करतो. नैवेद्यावर तुळशीपत्र ठेवतो. आपला नैवेद्य देवापर्यंत लवकर पोचावा ही भावना असते. वाईट शक्ती आपल्यावर आक्रमण करु नाही म्हणूनच दाराशी तुळस लावण्याची प्रथा आहे. दारासमोर वृंदावन असते. जुन्या काही रूढी, परंपरा आहे त्यामागे नक्कीच काहीतरी हेतू होते. आजकाल आपणास बऱ्याच प्रमाणात विसर पडत चाललाय. काही ठराविक ठिकाणीच तुळशी वृंदावन बघायला मिळते.

तुळशीमध्ये कार्बन आॅक्साईड शोषून ऑक्सिजन वायू सोडण्याचा गुणधर्म असल्यामुळे शरिर निरोगी रहाण्यासाठी मदत होते. घरासमोर तुळस असल्यास पिसवा, जंतू शिरकाव करत नाही. तुळस प्रदुषण नाशक आहे. हवा शुध्द करणे हा तिचा महत्त्वाचा गुणधर्म आहे. विज्ञान दृष्टीने तुलशी वनस्पती म्हणून खूप महत्वाची आहे. औषध म्हणून: तुळशीच्या पानांचा रस काढून पिणे अनेक आजारांवर गुणकारी ठरते, असे मानले जाते.

भारतीय उपखंडात आढळणारी ही वनस्पती औषधी आणि आध्यात्मिक दोन्ही दृष्ट्या महत्त्वाची मानली जाते. ती रोगप्रतिकारशक्ती वाढवण्यासाठी, तणाव कमी करण्यासाठी, आणि डोकेदुखीपासून आराम देण्यासाठी उपयुक्त आहे.

तुळशीचे अनेक आरोग्य विषयक फायदे आहेत.तुळशीची पानात व्हिटॅमिन सी आणि अँटीऑक्सिडंट्सचा उत्तम स्रोत आहेत, ज्यामुळे रोगप्रतिकारशक्ती वाढते. ही वनस्पती 'ॲडाप्टोजेन' म्हणून काम करते, ज्यामुळे शरीराला तणावाशी जुळवून घेण्यास मदत होते आणि शांत वाटते. तुळस एक नैसर्गिक वेदनाशामक आहे आणि मायग्रेनच्या वेदना कमी करण्यास मदत करू शकते. तुळशीचे सेवन पचन सुधारण्यास मदत करते आणि यूरिक ॲसिडची पातळी कमी करण्यास मदत करते. धार्मिक आणि आध्यात्मिक दृष्टीने तुळशीचे महत्त्व आहे. हिंदू धर्मात तुळशीला पवित्र मानले जाते आणि तिची पूजा केली जाते. असे मानले जाते की तुळशीचे रोप घरात असल्यास लक्ष्मीचा वास असतो आणि घरात सुख-समृद्धी येते. रविवारी तुळशीला पाणी घातले जात नाही, कारण या दिवशी ती भगवान विष्णूसाठी व्रत करते, अशीही धार्मिक मान्यता आहे.तुळस विविध पाककृतींमध्ये वापरली जाते, परंतु भारतीय तुळस ही गोड तुळशीपेक्षा वेगळी आणि थोडी तिखट असते.

हिंदूचे अंतःकरणात जसा तुळशिबद्दल पूज्यभाव, पवित्र भाव आहे, तसाच इतरही धर्मातही आदरभाव आहे. इंग्रजी शब्दकोषात तुळशीला पवित्र झाड' म्हटले आहे. ग्रीक भाषेत तुळशीला बेझिलीकाँन म्हणजे राजयोग म्हणतात. तुळशीच्या अंगी विशिष्ट शक्ति आहे असे मानतात.

आपल्या हिंदू धर्मात तुळशीचे दर्शन, स्पर्श, ध्यान, नमन, पूजन, रोपण, आणि सेवन ह्या गोष्टी युगायुगांची पापे, पातके, नष्ट करतात. म्हणूनच तुळशीला पापनाशिनी म्हणतात.

म्हणूनच म्हटले जाते, ज्या घरी तुळशीचे बन आहे, ते घर तीर्थक्षेत्रा सारखे पवित्र असते.

प्रत्येक हिंदू च्या घरी तुळस असावी असा संकेत आहे. प्रातःकाळी तुळशीचे दर्शन घ्यावे.

## वल्लभ भाई..

समर्थ पदवीसरदार
पटेल वल्लभ भाई
स्टॅचू ऑफ युनिटीने
आठवण जागी होई

भव्य पुतळा तो उंच
अस्मान जवळ येई
कर्तृत्व उंची अधिक
दहा दिशा गुण गाई

पोलादी पुरुष सार्थ
बिरूदावली तव देई
सुदृढ शरीर संपदा
व्यायामे केली घडाई

मन तितकेचं सौहार्द
स्नेहाळ ओल सवाई
संस्थानिका नमविले
स्वभावाची नवलाई

लढ्यातखणकर उभे
स्वातंत्र्यसेना सिपाई
गांधी मार्ग चालताना
खुणा दिसे ठाई ठाई

भारतचीन युध्दांदाज
तव दूर दर्शी चतुराई
अनंत उपकार केले
कशी व्हावी रे उतराई

पहिले उप पंतप्रधान
देशाची पाही भलाई
पंतप्रधानपद नाकारे
नको सत्तेची मलाई

– हेमंत मुसरीफ, पुणे
मो.९७३०३०६९९६

अक्षराज
अचूक ... बातमी

# 'वंदे मातरम' ला विरोध नकोच !




'वन्दे मातरम' या गीताच्या निर्मितीला १५० वर्षे पूर्ण होत असल्याने महाराष्ट्र शासनाने नवीन आदेश प्रसारित केला आहे. त्यात राज्यातील सर्व शाळांमध्ये 'वन्दे मातरम्' गीत वाचनाचे आदेश देण्यात आले आहेत. ३१ ऑक्टोबर ते ७ नोव्हेंबर या कालावधीत 'वन्दे मातरम्' गायनाचे आदेश देण्यात आले आहेत. या गीताचा इतिहास सांगणार्या प्रदर्शनाचे आयोजनही करण्याचे निर्देश दिलेले आहेत. शालेय शिक्षण विभागाचे अवर सचिव अ. रा. कुलकर्णी यांच्या स्वाक्षरीने हे आदेश देण्यात आले असून शिक्षण आयुक्तांना परिपत्रकाद्वारे सूचना देण्यात आल्या आहेत. स्वातंत्र्यलढ्यात 'वंदे मातरम' ही क्रांतिकारकांची प्रमुख घोषणा होती.

देशप्रेमी नागरिकांचा उर भरून आणणारी ही घोषणा त्याकाळी क्रांतीकारकांना मातृभूमिच्या स्वातंत्र्यासाठी प्राणपणाने लढण्याचे बळ देत होती, त्यांच्यात वीरश्री निर्माण करत होती, त्यांना क्रांतीची प्रेरणा देत होती. शेकडो क्रांतिकारक त्यावेळी 'वंदे मातरम' चा घोष करत हसत हसत बलीवेदीवर चढले, कितीतरी वीरांनी इंग्रजांच्या गोळ्या छातीवर झेलल्या, कारागृहात मरणप्राय यातना सहन केल्या. या सर्वांना संजीवनी देण्याचे कार्य त्यावेळी 'वंदे मातरम' या द्वीअक्षरी मंत्राने केले आहे. वंदे मातरम हे केवळ गीत नसून देशाच्या स्वातंत्र्यलढ्यातील प्रेरणास्रोत आहे त्यामुळे देशाप्रती प्रेम, स्वाभिमान आणि आस्था असणाऱ्या प्रत्येकाने जात-पात, धर्म-पंथ यांची बंधने झुगारून ते अभिमानाने म्हटलेच पाहिजे.

'जननी जन्म भूमिश्च स्वर्गादपि गरीयसी ।।' हे हजारो वर्षांपूर्वी लिहिलेल्या वाल्मिकी रामायणातील वाक्य आहे, याचा अर्थ आई आणि मातृभूमी हे दोन्हीही स्वर्गापेक्षा श्रेष्ठ आहेत. जन्मदात्या आईनंतर श्रेष्ठ कोणी असेल तर ती मातृभूमी आहे त्यामुळे तिला वंदन करणे हे या मातृभूमीत राहणाऱ्या प्रत्येक भारतीयांचे कर्तव्य आहे.

'वन्दे मातरम' बंधनकारक करणे योग्य नाही. 'वन्दे मातरम्'सारखे प्रश्न आणून मुसलमान धर्मियांना त्रास देण्याचा सरकारचा प्रयत्न आहे. मुसलमानांना 'वन्दे मातरम्' म्हणावयास भाग पाडणे चुकीचे आहे', अशा शब्दांत समाजवादी पक्षाचे प्रदेशाध्यक्ष आणि आमदार अबू आझमी यांनी अकलेचे तारे तोडल्याचे वृत्तपत्रांतून वाचनात आले. आझमी यांच्या या वक्तव्याचा कालपासून सर्वच स्तरांवर विरोध केला जात आहे. आझमी मागील अनेक वर्षांपासून मुंबईतील लोकप्रतिनिधी आहेत. राज्याच्या मंत्रिमंडळात त्यांनी मंत्रीपदही भूषवले आहे.

मतदारांनी त्यांना विश्वासाने निवडून दिले आहे; मात्र आजतागायत ते त्यांच्या कामापेक्षा त्यांच्यातील धर्मांधतेमुळेच अधिक चर्चेत असतात त्यामुळे ते पंथनिरपेक्ष राज्याचे लोकप्रतिनिधी आहेत कि एका ठराविक पंथाचे हा प्रश्नच आहे. जेव्हा देशाप्रती स्वाभिमान दाखवण्याची वेळ येते तेव्हा धर्म-पंथ बाजूला ठेवण्याची शिकवण आपले संविधान आणि आपली न्यायव्यवस्था आपल्याला देते. त्यामुळे अशा विषयांत आझमी यांनी खोडा घालणे चुकीचे आहे. 'अशा प्रकारचा आदेश काढून भाजप हिंदू-मुसलमान भेद करत आहेत',राजकारण करत आहे असा आरोप त्यांनी सत्ताधारी पक्षावर केला असला तरी 'हा विषय देशाभिमान दाखवण्याचा असल्याने तिथे धर्माचा किंवा पंथाचा संबंध येतो कुठे ?' असा उलटप्रश्न समस्त सामाजिक माध्यमांवर नेटकरी आझमी यांना विचारत आहेत. आझमी यांनी याआधीही एका पंथाची तळी उचलून अनेक देशहिताच्या आणि समाजहिताच्या निर्णयांना विरोध केला आहे ज्यातून आझमी यांची धर्मांधता स्पष्टपणे दिसून येते. देश स्वतंत्र व्हायच्या आधी भारत आणि पाकिस्तान असे वेगळे देश नव्हते. त्यावेळी स्वातंत्र्यलढ्यात हिंदू क्रांतिकारकांसह मुस्लमानसुद्धा मोठ्या संख्येने होते त्यावेळी 'वंदे मातरम' या जयघोषाला कोणीही विरोध केला नाही मग आझमी यांना आता पोटशूळ उठण्याचे काय कारण आहे असाही प्रश्न आज तरुणवर्गाकडून विचारला जात आहे. हिंदूंना मुसलमान मुलींशी लग्न करण्याचे आवाहन भाजपकडून केले जात असल्याचा आरोप आझमी यांनी यावेळी केला आहे.

हेच आझमी हिंदूंच्या मुळावर उठलेल्या आणि आजतागायत देशभरातील लाखो मुलींचा बळी घेणाऱ्या 'लव्ह जिहाद'च्या षड्यंत्राविषयी कधीच काही बोलताना दिसत नाहीत. लँड जिहाद, थुंक जिहाद विषयी कधी अवाक्षर काढत नाहीत. आझमी हे स्वतंत्र हिंदुस्थानातील लोकप्रतिनिधी आहेत पाकिस्तानातील नव्हे याचा त्यांनी विसर पडू देऊ नये, त्यामुळे स्वतंत्र हिंदुस्थानात घेतल्या जाणाऱ्या राष्ट्रहितकारी निर्णयाला धर्म-पंथ मध्ये आणून उगाचच विरोध करू नये !

जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई
संपर्क : ९६६४५५९७८०

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## मंद्रुपच्या नौशाद काझीने MPSC च्या परीक्षेत मिळवले घवघवीत यश



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.३१, सोलापूर :** दक्षिण सोलापूर तालुक्यात मंद्रुपसह परिसरातील गावात अजूनही बऱ्याच सोयीसुविधा उपलब्ध नाहीत. यात शिक्षणाची कास धरून अधिकारी होणे, ही फार मोठी गोष्ट आहे. हेच दक्षिण सोलापूर तालुक्यातील मंद्रुप येथील नौशाद शहाजहान काझी यानी करून दाखवले आहे.

ते मंद्रुप गावातील पहिले MPSC उत्तीर्ण झाले असून हे अनेकांसाठी नक्कीच प्रेरणादायी आहे.

नौशाद यांनी त्यांचे प्राथमिक शिक्षण मंद्रुपच्या जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत पुर्ण केले. त्यानंतर माध्यमिक शिक्षण महात्मा फुले माध्यमिक विद्यालय या ठिकाणी घेऊन नंतर सोलापूरच्या पानगल विद्यालयात कॉलेजचे शिक्षण व औरंगाबाद येथून गव्हर्नमेंट कॉलेजमधून B.Tech ची डिग्री पूर्ण केले.

नंतर NIT गोवा येथून M.Tech ही पदवी प्राप्त केल्यानंतर त्यांना सातारा नगरपरिषद येथे विद्युत अभियंता तसेच मुंबई मेट्रो मध्ये स्टेशन कंट्रोलरची तसेच ट्राफिक कंट्रोलर ची नोकरी मिळाली. सध्या ते मंत्रालय मध्ये सहाय्यक कक्ष अधिकारी म्हणून कार्यरत आहेत. नोकरी सुरू असताना स्पर्धा परीक्षांची तयारी सुरू केली. २०२४ मध्ये एमपीएससी परीक्षेचा फॉर्म भरला व परिक्षेत चांगले गुण मिळवत एमपीएससी परीक्षेत घवघवीत यश संपादन करत मुस्लिम समाजात महाराष्ट्रात पहिला क्रमांक तर एथड मध्ये महाराष्ट्रात राज्यातून आठवा क्रमांक मिळवला.

नौशादला त्याचे वडील शहाजहान काझी, स्व. देशपांडे सर, स्व.विजापूरे गुरूजी, बगले गुरूजी, कमळे मॅडम, शिवशंकर राऊत सर, मुन्ना शेख सर, परीक्षाळे सर यांचे मार्गदर्शन तर त्याच्या कुटुंबीयांची मोलाची साथ मिळाली.

## स्व. इंदिरा गांधी व वल्लभभाई पटेल यांना अभिवादन



**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.३१, पनवेल :** महानगरपालिकेच्या मुख्यालयात आज दिनांक ३१ ऑक्टोबर रोजी माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांची पुण्यतिथी व लोहपुरूष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंती निमित्ताने त्यांच्या प्रतिमेस आयुक्त मंगेश चितळे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. तसेच राष्ट्रीय एकता दिवसाची शपथ घेण्यात आली.

यावेळी अतिरीक्त गणेश शेटे, परिवहन व्यवस्थापक कैलास गावडे, उपायुक्त रविकिरण घोडके, उपायुक्त अभिषेक पराडकर, उपायुक्त नानासाहेब कामठे, मुख्य लेखाधिकारी मंगेश गावडे, मुख्य लेखा परिक्षक निलेश नलावडे, मुख्य लेखाधिकारी मंगेश गावडे, मुख्य लेखा परिक्षक निलेश नलावडे, मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. आनंद गोसावी, लेखाधिकारी संग्राम व्होरकाटे, उपलेखापाल संदिप खुरपे, सामान्य प्रशासन विभाग प्रमुख किर्ती महाजन, जनसंपर्क अधिकारी नितीन साके तसेच अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत 'ईज ऑफ डुईंग बिझिनेस' संदर्भात उद्योग विभागाचा आढावा



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.३१, मुंबई :** राज्यात'जिल्हा व्यवसाय सुधारणा कृती योजना २०२५'राबविण्यात येत आहे. १५४ सुधारणांचा समावेश असलेल्या या उपक्रमाची अंमलबजावणी १४ ऑगस्ट २०२६ पर्यंत केली जाणार आहे. यात राज्यातील जिल्हाधिकाऱ्यांसाठी'चिंतन शिबिर'आणि विभागीय बैठकांचे आयोजन करण्यात येणार असून राज्यातील प्रत्येक जिल्ह्याधिकाऱ्यांना अधिक अधिकार प्रदान करण्यात येणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली सह्याद्री अतिथीगृह येथे 'इज ऑफ डुईंग बिझिनेस' संदर्भात आढावा बैठक आयोजित करण्यात आली. या बैठकीस मुख्य सचिव राजेशकुमार तसेच प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी तर दूरदृश्यप्रणालीद्वारे राज्यातील विभागीय आयुक्त आणि जिल्हाधिकारी उपस्थित होते.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की,राज्याच्या औद्योगिक विकासाला गती देण्यासाठी ६ विभागीय समित्या स्थापन करण्यात आल्या असून,त्या ३१ डिसेंबर २०२५ पूर्वी आपले अहवाल सादर करतील. यातील नाशिक विभागाचे आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम यांच्या नेतृत्वाखाली 'ईज ऑफ डुईंग बिझनेस' सुधारणा समिती कार्यरत आहे. तर विजय सूर्यवंशी (कोकण विभाग) आणि जितेंद्र पापळकर (छत्रपती संभाजीनगर विभाग) अनुक्रमे औद्योगिक संसाधन वापर आणि भू-बँक प्रोत्साहन या विषयांवर लक्ष केंद्रित करत आहेत.बैठकीदरम्यान राज्यातील 'ईज ऑफ डुईंग बिझनेस' प्रगती,अंमलबजावणी केलेल्या सुधारणा तसेच आगामी उपक्रमांचा आढावा घेण्यात आला. महाराष्ट्राने'ईज ऑफ डुईंग बिझनेस २०२४'मूल्यांकनात लक्षणीय प्रगती साधली असून ४०२ पैकी ३९९ सुधारणा पूर्ण झाल्या आहेत. त्यामुळे राज्याचा अंमलबजावणी स्कोअर ९९.२५ टक्क्यांवर पोहोचला आहे. महाराष्ट्राला यापूर्वी'ईज ऑफ डुईंग बिझनेस' २०२०-२१'मध्ये अचिव्हर आणि'ईओडीबी२०२२'मध्ये टॉप अचिव्हर म्हणून गौरविण्यात आले होते.'ईज ऑफ डुईंग बिझिनेस २०२४'चा अंतिम निकाल ११ नोव्हेंबर २०२५ रोजी जाहीर होणार आहे.'ईज ऑफ डुईंग बिझिनेस' अंतर्गत भूखंड आणि बांधकाम परवाने,कामगार सुधारणा,उपयुक्तता आणि तपासणी प्रणाली तसेच नियामक सुलभीकरण ही प्रमुख लक्ष्यकेंद्रीत क्षेत्रे आहेत. त्याचबरोबर मैत्री २.० द्वारे संपूर्ण एकल-खिडकी परिसंस्था कार्यान्वित करण्याची योजना आहे. त्याचबरोबर सिंगल साइन-ऑन,परवान्यांची स्थिती,सामान्य अर्ज फॉर्म,एकत्रित पेमेंट, डॅशबोर्ड्स,तपासणी,तक्रार निवारण आणि वापरकर्ता अभिप्राय यासारखे आवश्यक मॉड्यूल्स मैत्री २.० मध्ये समाविष्ट असणार आहेत.महाराष्ट्रात व्यवसाय सुलभता, नियमनमुक्ती आणि क्षेत्रीय मंजुरी सुलभीकरणाच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊले उचलली जात आहेत.

# महाबळेश्वर तालुक्यातील अतिक्रमण हटवा ! महसूलमंत्री बावनकुळेंचे तातडीने निर्देश



रियाज मुजावर

महाबळेश्वर : महाबळेश्वरच्या नैसर्गिक सौंदर्याचे आणि पर्यावरणाचे रक्षण करण्याच्या दृष्टीने राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी अत्यंत कठोर भूमिका घेतली आहे. महाबळेश्वर तालुक्यातील शासकीय तसेच देवस्थान जमिनींवरील सर्व बेकायदेशीर अतिक्रमण तातडीने हटवण्याचे स्पष्ट निर्देश त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांसह संबंधित अधिकाऱ्यांना दिले आहेत.

**भाडेपट्टा नूतनीकरणाचे अधिकार शासनस्तरावर...**

महाबळेश्वरमधील भूभागाची प्राकृतिक संवेदनशीलता आणि जमिनींचे वनसदृश स्वरूप लक्षात घेऊन महसूलमंत्र्यांनी आणखी एक महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. यापुढे भाडेपट्टा नूतनीकरणाचे जिल्हाधिकारी यांच्याकडे असलेले अधिकार शासनस्तरावर घेण्याचे निर्देश त्यांनी दिले आहेत.

**ड्रोन सर्वेक्षण आणि कठोर पावले...**

मंत्रालयात झालेल्या बैठकीत महसूलमंत्री बावनकुळे यांनी अधिकाऱ्यांची खरडपट्टी काढत, अतिक्रमण हटवण्यासाठी ड्रोन सर्वेक्षणाचा वापर करण्याचे स्पष्ट निर्देश दिले. याशिवाय त्यांनी खालीलप्रमाणे महत्त्वाचे आदेश दिले:

**नकाशे आणि रेकॉर्ड अद्ययावत :** महाबळेश्वर परिसरातील सर्व शासकीय व देवस्थान जमिनींचे नकाशे आणि रेकॉर्ड तत्काळ अद्ययावत करावेत.

**नियंत्रण यंत्रणा सक्षम :** भविष्यात नवीन अतिक्रमण होऊ नये, यासाठी नियंत्रण यंत्रणा अधिक कार्यक्षम करावी.

**अटींचे पालन तपासा :** आजपर्यंत पूर्वमान्यता मिळालेल्या २६ प्रस्तावांनी शासनाच्या अटींचे पालन केले आहे का, याची स्थळ पाहणी करून अहवाल सादर करण्याचे आदेश वाईचे प्रांताधिकारी यांना देण्यात आले आहेत.

**वर्ग १ रूपांतरण :** सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशांचा विचार करून भाडेपट्टा जमिनींचे वर्ग १ मध्ये रूपांतर करण्यासाठी विधी व न्याय विभागाचे मत घेण्यात यावे.या बैठकीस जिल्हाधिकारी संतोष पाटील आणि भाजपचे माजी खासदार किरीट सोमय्या हे दूरदृश्य प्रणालीद्वारे उपस्थित होते.

**'अतिक्रमण दिसल्यास कठोर कारवाई'**

महसूलमंत्री बावनकुळे यांनी अधिकाऱ्यांवर कठोर कारवाईचा इशारा दिला आहे. ते म्हणाले, शासकीय किंवा देवस्थान जमिनींवर अतिक्रमण करणाऱ्यांना, तसेच त्याकडे दुर्लक्ष करणाऱ्या अधिकाऱ्यांना सोडले जाणार नाही. माझ्या पुढील महाबळेश्वर दौऱ्यात जर अतिक्रमण दिसले, तर कठोर कारवाई केली जाईल.

महाबळेश्वर येथील पर्यावरणाचे रक्षण करणे ही शासनाची जबाबदारी आहे आणि शासनाने ठरविलेल्या नियमांनुसारच विकासकामे व्हावीत, यासाठी कठोर पावले उचलली जातील, असेही त्यांनी ठामपणे सांगितले.

# नागपूर शहर व खापरखेडा पोलिसांच्या वतीने 'सदभावना दौड'चे यशस्वी आयोजन



**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.३१, नागपूर :** भारताचे पहिले गृहमंत्री व 'लोहपुरुष' सरदार वल्लभभाई पटेल यांच्या १५० व्या जयंतीचे औचित्य साधून नागपूर शहर पोलीस आयुक्तालय आणि खापरखेडा पोलिसांच्या संयुक्त विद्यमाने ३१ ऑक्टोबर शुक्रवारला 'सदभावना दौड' उत्साहात पार पडली.

सरदार पटेल यांच्या जयंतीनिमित्त ३१ ऑक्टोबर हा दिवस 'राष्ट्रीय एकता दिवस' म्हणून साजरा केला जातो त्यामूळे शुक्रवारला सकाळी ७.३० वाजता सदभावना दौडचे आयोजन करण्यात आले होते. सदभावना दौड मध्ये खेळाडू, विद्यार्थी, युवक-युवती आणि लहान मुलांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला. खापरखेडा पोलीस ठाण्यापासून दौड सुरू करून मुख्य बाजारपेठ, अन्नामोड, चेमरी बिल्डिंग मार्गे परत खापरखेडा पोलीस ठाणे येथे सदभावना दौडचा समारोप करण्यात आला.

सदभावना दौड मार्गावर पिण्याच्या पाणी, बिस्किटे, केळी याशिवाय अल्पोपहाराची चोख व्यवस्था खापरखेडा पोलिसांनी केली होती. शिवाय सुरक्षेच्या दृष्टीकोनातून सदभावना दौड मार्गावर रुग्णवाहिकाही उपलब्ध करण्यात आली होती. सदभावना दौड कार्यक्रमाला वरिष्ठ पोलीस निरीक्षक हरिष रुमकर, एपीआय राहुल चव्हाण, एएसआय विलास करंगामी, आशिष कोहंदे, खापरखेडा पत्रकार संघाचे अध्यक्ष सुनील जालंदर, पत्रकार प्रकाश साद, अभय मिश्रा, विलास महले, प्रशिक्षक विपीन शर्मा, ईश्वर ठाकरे, विरेंद्र भारद्वाज यांच्यासह पोलीस कर्मचारी आणि मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

याप्रसंगी मार्गदर्शन करताना वरिष्ठ पोलीस निरीक्षक हरिष रुमकर यांनी सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जीवनावर प्रकाश टाकला. ते म्हणाले बारडोली सत्याग्रहात महिलांनी वल्लभभाई पटेल यांना 'सरदार' ही उपाधी दिली होती. 'भारताचे लोहपुरुष' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सरदार पटेलांनी राष्ट्रीय एकता, अखंडता आणि सुरक्षितता या मूल्यांना सर्वोच्च स्थान दिले.शिवाय सरदार पटेलांनी देशाला 'एक भारत, श्रेष्ठ भारत' चा संदेश दिला. गुजरातमध्ये उभारलेली 'स्टॅच्यू ऑफ युनिटी' ही जगातील सर्वात उंच मूर्ती त्यांच्या राष्ट्रीय एकात्मतेच्या विचारांची आणि योगदानाची साक्ष देत असल्याचे सांगितले.

कार्यक्रमाला उपस्थितांनी सरदार वल्लभभाई पटेल यांना अभिवादन करण्यात आले. यावेळी त्यांचे विचार आत्मसात करून देशाला अधिक मजबूत करण्याचा संकल्प करण्यात आला.

# राजस्थानच्या जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांचा खंडाळा तालुका अभ्यास दौरा



**अक्षराज : सुहास महांगरे**

**दि.३१, खंडाळा (सातारा) :** पंचायत राज विभाग राजस्थान राज्य व राज्य पाणी व स्वच्छता मिशन महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त निर्देशानुसार राज्यस्थान राज्यातील विविध जिल्ह्यातील मुख्य कार्यकारी अधिकारी तसेच कार्यकारी अभियंता यांचे एक प्रतिनिधी मंडळ महाराष्ट्र राज्यातील स्वच्छता भारत मिशन विषयक कामकाजाच्या अनुषंगाने अभ्यास दौऱ्यासाठी महाराष्ट्र राज्यातील सातारा जिल्ह्यातील खंडाळा तालुक्यातील विंग गावामध्ये रविंद्र गौरव साळुंखे (भा.प्र.से.) मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद अलवर गिरधर (भा.प्र.से.) मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद गगननगर मा. मीदुल सिंग (भा.प्र.से.) मुख्य कार्यकारी अधिकारी रमेश कुमार जिल्हा परिषद भरतपुर. कार्यकारी अभियंता नंदकुमार लखीवाल गगननगर, कार्यकारी अभियंता अलवर हे सर्व आले होते. त्यांनी ग्रामपंचायत विंग येथील कंपोस्ट प्लांटर व सांडपाणी प्रकल्पाची पाहणी केली. सांडपाणी प्रकल्पाची माहिती पंचायत समिती खंडाळा गटविकास अधिकारी वर्ग १ अनिल वाघमारे यांनी सविस्तर माहिती दिली. तसेच गावातील विविध विकास कामाची पाहणी करून ग्रामपंचायत ऑफिसमधील कामाचा आढावा घेतला. ग्रामपंचायत यांच्या केलेल्या विकास कामाचे राज्यस्थान सीईओ व त्यांचे सर्व अधिकारी वर्ग यांनी गावाचे कौतुक केले. विंग गावाने एक आदर्श मॉडेल तयार केले आहे. तसेच सदर कार्यक्रमाला सातारा जिल्हा परिषदेच्या प्रज्ञा माने पंचायत समिती खंडाळा गटविकास अधिकारी वर्ग १ अनिल वाघमारे, सहाय्यक गटविकास अधिकारी पंचायत समिती खंडाळा प्रकाशकुमार बोंबले, विस्तार अधिकारी पंचायत समिती खंडाळा सुनील बोडरे, सातारा जिल्हा परिषदेचे स्वच्छता व पाणी पुरवठा अधिकारी राऊत आणि त्यांचे सहकारी अधिकारी खंडाळा तालुका गट संसाधन केंद्रातील अतुल गायकवाड, बीआरसी, तसेच सीमा गायकवाड, सदर कार्यक्रमाला सर्व शासकीय अधिकारी सरपंच स्वप्निल तळेकर, उपसरपंच पूनम तळेकर व सर्व सदस्य ग्रामपंचायत अधिकारी लक्ष्मण पडळकर, जि.प.प्रा.केन्द्र शाळा विंग चे शिक्षक दत्तात्रय महांगरे बचत गटातील उमेद च्या सर्व महिला ग्रामस्थ ग्राम पंचायत कर्मचारी उपस्थित होते.

# लासलगाव पोलीस ठाण्याच्या वतीने एकता दौड उत्साहात संपन्न





**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.३१, विंचूर (नाशिक) :** भारताचे लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रीय एकता दिनाच्या निमित्ताने लासलगाव पोलीस ठाण्याच्या वतीने आयोजित एकता दौड उत्साहात पार पडली.

विशेष पोलीस महानिरीक्षक दत्तात्रय कराळे, जिल्हा पोलिस अधीक्षक बाळासाहेब पाटील, अपर पोलिस अधीक्षक आदित्य मिरखेलकर व उपविभागीय अधिकारी कांतीलाल पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक भास्करराव शिंदे यांच्या नेतृत्वात या दौडीचे आयोजन करण्यात आले.

दौडीची सुरुवात सकाळी ६.३० वाजता लासलगाव पोलीस ठाण्यात सरदार वल्लभभाई पटेल यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून झाली. लासलगाव पोलीस ठाण्यातून सुरू झालेली दौड विंचूर रोडवरील स्वामी रिसॉर्ट येथे सांगता झाली.

या प्रसंगी विविध सामाजिक, शैक्षणिक, व्यावसायिक संस्था, डॉक्टर्स असोसिएशन, स्विमिंग व सायकलिंग ग्रुप, पत्रकार बांधव, पोलिस पाटील, ग्रामपंचायत सदस्य, कृषी उत्पन्न बाजार समिती, व्यापारी वर्ग, शासकीय व निमशासकीय कार्यालये तसेच शाळा-महाविद्यालये आणि अनेक सामाजिक-धार्मिक संस्थांचे पदाधिकारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

राष्ट्रीय एकता दिनानिमित्त आयोजित या एकता दौडीचा उद्देश नागरिकांमध्ये एकता, बंधुता आणि देशभक्तीची भावना दृढ करणे हा होता. या उपक्रमाला नागरिकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. यशस्वी आयोजनासाठी सहकार्य करणाऱ्या सर्व सहभागी नागरिक, संस्था, माध्यम प्रतिनिधी, स्वयंसेवक व लासलगाव पोलीस ठाण्याचे सर्व कर्मचारी यांचे स.पो.नि. भास्करराव शिंदे यांनी आभार मानले.

# पारनेर नगरपंचायत विकास कामांना शासनाची मंजुरी - आ.दाते

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.३१, पारनेर (अहिल्यानगर) :** पारनेर नगरपंचायत क्षेत्रातील नागरिकांसाठी आनंदाची बातमी आहे. नगरविकास विभागाच्या योजनेअंतर्गत पारनेर नगरपंचायत क्षेत्रातील ५ कोटी रुपयांच्या विविध विकासकामांना शासनस्तरावरून मंजुरी मिळाली असून, या कामांसाठीचा निधी लवकरच उपलब्ध होणार असल्याची माहिती पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते सर यांनी दिली आहे. आमदार दाते सर यांनी पारनेर शहराच्या पायाभूत सुविधांच्या उन्नतीसाठी नगरविकास विभागाकडे सातत्याने पाठपुरावा केला होता. अखेर त्यांच्या प्रयत्नांना यश मिळून पाच कोटी रुपयांच्या महत्वाच्या विकासकामांना शासनाची मंजुरी मिळाली आहे.

पारनेर नगरपंचायत क्षेत्रातील वार्ड क्र. २ मध्ये असलेल्या खंडेश्वर मंदिर परिसरात नगरपरिषदेच्या सामाजिक सभागृहाचे बांधकाम करण्यात येणार आहे. या कामासाठी ३० लाख रुपये निधी मंजूर झाला आहे. तसेच वार्ड क्र. ६ मधील पुजारी वस्तीत गणपती मंदिर परिसरात नगरपरिषदेच्या सामाजिक सभागृहाचे बांधकाम आणि वार्ड क्र. ८ मधील आणखी एक सभागृह बांधण्यास एकत्रित १६ लाख रुपये निधी मंजूर करण्यात आला आहे. याशिवाय वार्ड क्र. २ मधील कार्तिक स्वामी मंदिर परिसरात नगरपरिषदेच्या सामाजिक सभागृहाचे बांधकाम करण्यासाठी १५ लाख रुपये, तसेच कुलट वस्तीत खंडोबा मंदिर परिसरात सभागृह उभारण्यासाठी १६ लाख रुपये मंजूर करण्यात आले आहेत.



याचबरोबर पारनेर नगरपंचायत क्षेत्रातील बोळकोबा गल्लीतील गणपती मंदिर परिसरात नगरपरिषदेच्या सामाजिक सभागृहाचे बांधकाम आणि वार्ड क्र. ७ मधील वैदुवाडी येथील कानिफनाथ मंदिर परिसरात सभागृह उभारण्यास एकत्रित १५ लाख रुपये निधी मंजूर झाला आहे. या पाचही कामांसाठीच्या १७२ लाख रुपये निधीस शासनाने मंजूरी दिली असुन ३२८ लक्ष रुपयांचा इतर नागरी सुविधांच्या कामासाठीही निधी मंजूर केला आहे. यामुळे पारनेर शहरातील धार्मिक, सामाजिक आणि सांस्कृतिक उपक्रमांसाठी आधुनिक व सुसज्ज सभागृहांची उपलब्धता होणार असून नागरी सुविधांवर भर दिल्याने नागरीकांना आदर्श व उत्तम प्रकारच्या सुविधा उपलब्ध होण्यास मदत होणार आहे.

आमदार काशिनाथ दाते यांनी सांगितले की, पारनेर शहरातील नागरिकांना सामाजिक, धार्मिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी योग्य जागेचा अभाव होता.

नगरविकास विभागाच्या माध्यमातून या सभागृहांची मंजुरी मिळाल्याने नागरिकांच्या अपेक्षा पूर्ण होतील आणि शहरात विविध उपक्रमांसाठी सक्षम सुविधा उपलब्ध होतील.

आमदार दाते यांनी संबंधित निधी मंजूर करून देण्यासाठी महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री व नगरविकास खात्याचे मंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, तसेच अहमदनगर जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचे पारनेर शहर व तालुक्यातील जनतेच्या वतीने आभार मानले आहेत.

> नमो उद्यान करणेसाठी रु. १०० लक्ष, २८ एप्रिल रोजी नगरपंचायत विकासकामे करीता रु. ६०० लक्ष, आमदार स्थानिक निधीतुन रु. ४० लक्ष, पुन्हा स्थानिक विकास निधी रु. १९.०० लक्ष, आणि दि. ३१ आक्टोबर रोजी नगरपंचायत कामांसाठी रु. ५०० लक्ष, पारनेर शहराचा सामाजिक आणि सांस्कृतिक विकास अधिक बळकट होणार असून, नागरिकांना उपक्रमांच्या आयोजनासाठी व तेथे जमणाऱ्या नागरिकांसह स्थानिक नागरिकांसाठी उत्तम सुविधा उपलब्ध होतील. पारनेर नगरपंचायत क्षेत्रात विकासाची नवी पहाट उगवली असणार आहे.
>
> **- आ.काशिनाथ दाते (विधानसभा सदस्य)**

# रन फॉर युनिटीसाठी पोलिसांचा पुढाकार; राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश

**अक्षराज : साहेबराव गागलवाड**

**दि.३१, मुदखेड (नांदेड) :** सरदार वल्लभाई पटेल यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त राबविण्यात येत असलेल्या रन फॉर युनिटी उपक्रमासाठी पोलिसांनी पुढाकार घेतला असून राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश देत सर्व धर्म समभावाची भावना जागृत करून एकोपा निर्माण करण्याचा निर्धार केला आहे.

सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंती निमित्त देशात व राज्यात एकता दिवस साजरा केला जात आहे. यानिमित्त जिल्ह्यात पोलीस प्रशासनाच्या वतीने रन फॉर युनिटी उपक्रम राबविण्याचा निर्णय पोलीस महानिरीक्षक शहाजी उमाप, पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, अतिरिक्त पोलीस अधीक्षक अर्चना पाटील, ग्रामीण पोलीस उपअधीक्षक डेनल बेन यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यांतील प्रत्येक पोलीस ठाण्यात रन फॉर युनिटीचा उपक्रम राबविण्यात आला आहे. या अनुषंगाने पोलीस निरीक्षक दत्तात्रेय मंठाळे, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक यु.जी बुकत्तरे, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक एस.ए.आडे यांच्या उपस्थितीत मुख्य चौरस्ता ते डोंगरगाव रन फॉर युनिटीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी भाजप जिल्हा सरचिटणीस बाळासाहेब देशमुख, काँग्रेस तालुकाध्यक्ष प्रताप देशमुख, उपसरपंच प्रदीप देशमुख, उत्तमराव लोमटे, माध्यम समूहाची प्रतिनिधी राहुल आठवले, नामदेव बिचेवार, दिगंबर टिप्परसे, शिवाजीराव देशमुख, सदाशिव तांडे, दीपक पाटील, पोलीस पाटील सदानंद पवार, माधव पावडे, योगेश पवार यांच्यासह आदींची उपस्थिती होती.




पोलीस प्रशासनाच्या रन फॉर युनिटी उद्देशा संदर्भाचे महत्व पटवून देण्यात आले. पोलीस निरीक्षक दत्तात्रेय मंठाळे यांनी राष्ट्रीय एकात्मता सर्व धर्म समभाव एकोप्याची भावना जागृत ठेवण्यासंदर्भात एक संघ निर्मितीचा संदेश यावेळी ग्रामस्थांना दिला. यानंतर बारड चौकातून डोंगरगाव तीन किलोमीटर मॅरेथॉन रॅली काढण्यात आली होती. या रॅलीचे डोंगरगाव ग्रामस्थांनी जल्लोषात स्वागत केले. या उपक्रमामुळे पोलीस व ग्रामस्थात समन्वयाची भावना दिसून आली . या उपक्रमासाठी पोलीस निरीक्षक दत्तात्रेय मंठाळे , सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक यु. जी बुक्तारे, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक एस.ए.आडे, अमरनाथ गंगाधर कदम, भाऊराव माणिकराव पावडे, संजय प्रभाकर करंजकर, अझरुद्दीन वालिओदिन मोहमंद, विजय दत्तात्रय गायकवाड, रत्नसागर मिलीदराव कदम, आनंद उकंडजी भाडेकर एचसी, सुरेश लक्ष्मणराव घुगे, सखाराम व्यंक्टराव नवघरे, दत्तात्रय बालासाहेब देशमुख, राम विठठल बोचरे,दत्ता गोविंदराव ढगे,शिवराज गोविंदराव वाडीकर,बालाजी रोहिदास सोनकांबळे,विनोद उत्तमराव अंबीलवादे,सिद्धार्थ भिमराव चौदंते, रुपाली विनायराव कळणे,अंकिता बालाजी पुंजरवाड, शितल रामदास पौळ यांच्या सह आदिंनी पुढाकार घेतला.

# विसापुरात मुख्यमंत्री पंचायतराज अभियान तपासणी; निकष पूर्ण करण्याचे दिले निर्देश



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.३१, विसापूर (चंद्रपूर) :** शासनाच्या ग्रामविकास व पंचायतराज विभागांतर्गत राबविण्यात येत असलेल्या सशक्त पंचायत, समृद्ध महाराष्ट्र मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान तपासणी पथकाने बुधवारी बल्लारपूर तालुक्यातील विसापूर ग्रामपंचायत मध्ये भेट दिली. यावेळी ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यांनी अधिकाऱ्यांचे आदरातिथ्य केले. दरम्यान मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानातील निकष पूर्ण करण्याचे निर्देश समितीच्या प्रमुख जिल्हा परिषद प्रकल्प संचालक मंजिरी टकले यांनी ग्रामपंचायतला दिले.

यावेळी तपासणी समितीच्या प्रमुख जिल्हा परिषद प्रकल्प संचालक मंजिरी टकले, गटविकास अधिकारी धनंजय साळवे, पंचायत विस्तार अधिकारी दिलीप बैलनवार, कृषी विस्तार अधिकारी नितीन ढवस, शिक्षण विस्तार अधिकारी रविंद्र लामगे, सरपंच वर्षा कुळमेथे, उपसरपंच अनेकश्वर मेश्राम, घरकुल बांधकाम अभियंता प्रमोद शास्त्रकार, पंचायत अधिकारी गणेश कोकोडे, ग्रामपंचायत सदस्य विद्या देवाळकर, रिना कांबळे, शशीकला जीवने यांची उपस्थिती होती. यावेळी मंजिरी टकले यांनी मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान यशस्वीरित्या पूर्ण करण्यासाठी सुशासन युक्त पंचायत, सक्षम पंचायत, जल, समृद्ध, स्वच्छ व हरीतगाव, मनरेगा योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी, गावपातळीवर संस्थेचे सक्षमीकरण, सामाजिक न्याय व उपजीविका विकास, लोकसहभागातून विकास आदी बाबींचे उपक्रम सुरु निकष पूर्ण करण्याचे निर्देश त्यांनी ग्रामपंचायतीच्या पदाधिकाऱ्यांना दिले.

दरम्यान प्राथमिक तपासणी दरम्यान काही बाबींवर विचारणा केली. आयुष्यमान कार्ड उद्दीष्ट गाठण्यासाठी त्वरित उपाययोजना करण्याचे निर्देश देखील त्यांनी दिले. यावेळी विसापूर येथील सरपंच वर्षा कुळमेथे व उपसरपंच अनेकश्वर मेश्राम यांनी जिल्हा परिषद प्रकल्प संचालक मंजिरी टकले यांचे पुष्पगुच्छ प्रदान करून आदरातिथ्य केले. यावेळी बचत गटांच्या पदाधिकारी, अंगणवाडी सेविका, विविध विभागाचे अधिकारी व ग्रामपंचायत सदस्यांची उपस्थिती होती.

# थोडक्यात

## महाराष्ट्र विद्यालयाचा कुस्तीगीर अभय बंदेवार राज्यस्तरावर

**अक्षराज : दिवाकर घेर**



**दि.३१, नागपूर :** सुरेश भट सभागृह रेशीम बाग नागपूर येथे संपन्न झालेल्या विभागीय शालेय कुस्ती स्पर्धेत महाराष्ट्र विद्यालयाच्या कुस्तीगीर अभय बंदेवार याने उल्लेखनीय कामगिरी करून राज्यस्तरीय स्पर्धेसाठी आपली निवड निश्चित केली. १७ वर्षा खालील वयोगटात मुलांमध्ये ७१ किलो खाली अभय बंदेवार याने उपांत्य सामन्यात भंडारा जिल्ह्याच्या खेळाडूवर मात केली.तर अंतिम सामन्यात गोंदिया जिल्ह्याच्या खेळाडूचा पराभव केला.

मात्र १९ वर्षा खालील मुलामध्ये ७० किलो खाली कुशल आवळे द्वितीय क्रमांकावर समाधान मानावे लागले. प्रथम क्रमांक प्राप्त करणारा अभय बंदेवार रायगड जिल्ह्यातील खोपोली येथे होणाऱ्या शालेय राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेकरिता नागपूर विभागाचे प्रतिनिधित्व करणार आहेत. महाराष्ट्र राज्य शिक्षण संस्थेचे सुनीलबाबू केदार, सचिव सुहासताई केदार, सुधिरभाऊ केदार व संस्थेचे सर्व पदाधिकारी, विद्यालयाचे मुख्याध्यापक अरुण वडस्कर, उपमुख्याध्यापक चंद्रशेखर लिखार, प्रा.विजय टेकाडे, क्रीडाशिक्षक धर्मेंद्र सुर्यवंशी, धैर्यशील सुटे व सर्व शिक्षक व कर्मचारी वर्गाने खेळाडूंचे अभिनंदन केले.

## पालम पोलीस ठाण्यातर्फे आयोजित 'रन फॉर युनिटी'

**अक्षराज : बालासाहेब फुलपगार**




**दि.३१, पालम (परभणी) :** लोहपुरुष सरदार वल्लभाई पटेल यांची १५० व्या जयंती निमित्त पालम पोलीस ठाण्यातर्फे रन फॉर युनिटी हा कार्यक्रम आज शुक्रवार, दि.३१ आक्टोबर २०२५ रोजी आयोजित केला होता. या कार्यक्रमाचे मुख्य उद्दिष्ट राष्ट्रीय एकता, अखंडता आणि देशभक्तीचा संदेश देण्या सोबतच वैयक्तिक आरोग्याची काळजी घेणे हा होता. सदरील कार्यक्रमासाठी पालम शहर व तालुक्यातील जनतेने उत्सुर्त सहभाग नोंदवित सकाळी सहा वाजता पालम पोलीस स्टेशन येथे उपस्थित राहून रन फॉर युनिटीमधे सहभाग घेतला.पालम पोलीस स्टेशन ते परभणी रोड दरम्यानच्या २ किलोमीटर अंतरापर्यंत दौडीचे आयोजन केले होते.या कार्यक्रमाला राजकीय तसेच सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांनी उपस्थिती लावली. दौड संपल्यावर उपस्थितांना फळं व बिस्किटे वाटप करण्यात आली. पोलीस निरीक्षक शेषराव खटाणे यांनी उपस्थितांना रन फॉर युनिटी आयोजनामागचे महत्त्व सांगितले.यावेळी डॉ.बालाजी ईप्पर यांनी प्रत्येकाने किमान एक तास तरी शरीर तंदुरुस्त ठेवण्यासाठी दररोज सकाळी व्यायाम, योगासनाचे महत्त्व संस्कृत सुभाषितााद्वारे सांगत उपस्थितांना मार्गदर्शन केले. ॲड रामजी मणियार यांनी सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकत जयंतीचे महत्त्व विशद केले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन पोलीस निरीक्षक शेषराव खटाणे यांनी करत, राष्ट्रगीताने कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला.

## दक्षता जनजागृती सप्ताह निमित्त पोलिस अधिक्षक शिवराज पाटील यांचे व्याख्यान

**अक्षराज : जे.के.पोळ**




**दि.३१, पनवेल :** केंद्रीय दक्षता आयोग, तसेच राज्य शासनाच्या सूचनेनुसार दक्षता जनजागृती सप्ताह साजरा केला जात आहे. या अंतर्गत शुक्रवार, दिनांक ३१ ऑक्टोबर रोजी महानगरपालिका आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात लाचलुचपत प्रतिबंधक विभाग ठाणे परिक्षेत्राचे पोलिस अधिक्षक शिवराज पाटील यांच्या मार्गदर्शनपर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी बोलताना पोलिस अधिक्षक शिवराज पाटील म्हणाले, कोणत्याही प्रलोभनांना भुलून न जाता शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांनी समाधानाने, प्रामाणिकपणे व सचोटीने काम करावे. तसेच अधिकारी, कर्मचारी व नागरिकांमध्ये भ्रष्टाचाराबाबत जनजागृतीची आवश्यकता स्पष्ट करताना त्यांनी भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्याची माहिती सांगितली. यावेळी आपल्या प्रास्ताविकामध्ये आयुक्त मंगेश चितळे यांनी शासकीय सेवेत काम करताना अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सर्व नियमांचे पालन करत काम सचोटीने, निस्पृह काम करायला हवे असे प्रतिपादन केले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपायुक्त स्वरूप खारगे यांनी केले तसेच उपस्थितांचे आभार परिवहन व्यवस्थापक कैलास गावडे यांनी मानले. यावेळी मुख्य लेखाधिकारी मंगेश गावडे, मुख्य लेखा परिक्षक निलेश नलावडे, उपायुक्त डॉ. वैभव विधाते, उपायुक्त रविकिरण घोडके, उपायुक्त नानासाहेब कामठे, मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. आनंद गोसावी, लेखाधिकारी संग्राम ऱ्होरकाटे तसेच लाचलुचपत प्रतिबंध विभागचे अप्पर पोलिस निरीक्षक भागवत सोनावणे, पोलिस उपअधीक्षक धर्मा सोनके उपस्थित होते. या कार्यक्रमास महापालिका अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# टाकळी ढोकेश्वर परिसरात नंदी बैलाच्या गुबूगुबूच्या झंकारात दिवाळी रंगली

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.३०, पारनेर (अहिल्यानगर) :** जगात नाव निघू दे...धंद्यापाण्याला बरकत दे.. शेती बहरू दे... लेकरबाळाला सुखी ठेव...असा आशिर्वाद दे म्हाया बहिनीला असे म्हणत गळ्यातील ढोलक्याचा गुबू.. गूबूच्या आणि पायातील चाळांच्या आवाजाच्या झंकारात सनईतून निघालेल्या सुरातील गाण्यावर नंदीबैल गळ्यातील घुंगराच्या माळ हलवत ठेका धरतो. नंदीबैलवाला आला रे..आला रे..असा चिमुकल्यांचा गलबला ढोलक वाजवीत नंदीबैलाच्या पाठीवर रंगेबेरंगी झूल, गळ्यात कवड्यांच्या माळा, शिंगांना विविध रंगांच्या कापड बांधतात आणि पायात चाळांचा झंकार! वाघवाडी ढवळपुरी येथिल तिरमली (नंदीबैलवाले) सुरेश साहेबराव देशमुख,सेटीबा व्यंकू देशमुख, साहेबराव सुरेश देशमुख,साहादू शेटीबा देशमुख आणि दिपक दगडू देशमुख हे आपल्या सुबाण्या या नंदीबैलासह दिवाळीच्या काळात टाकळी ढोकेश्वर परिसरात दारोदारी फिरत आहेत. सनई ,ढोलकी - ताशांच्या गुबू गूबूच्या झंकारात नंदीबैलच्या नृत्यकौशल्याने बालगोपाळांसह अन् दुसरीकडे कुत्र्यांच्या भुंकण्याची घाई हे चित्र अजूनही ग्रामीण भागात वाडी वस्तीवर दिवाळीच्या काळात पहावयास मिळते. पारंपरिक लोकरंजन करणारे तिरमली नंदीबैल वाल्याचा पेहेराव केलेला फेटा



तर गळ्यात ढोलके तशा अन् हातात सनई घेऊन हे कलाकार वाडी वस्तीवर पहावयास मिळतात. घुंगराच्या अन् ढोलक्याच्या तालावर दारोदार भटकंती करणारे नंदीबैलाचा खेळ मोठ्या कौशल्याने करताना दिसतात. दारात आलेल्या नंदीबैलाला सुपात धान्य अन ओवाळणी साहित्य घेऊन सुवासिनी महिला मंडळी येतात. तांब्याभर पाणी नंदीबैलाच्या पायावर टाकून हळदी कुंकवाने त्याची पूजा करून डाळ - गुळ अर्पण केले जाते. वाडी वस्ती असेल तर नागरिकांना एकत्रित करून नंदीबैलाचा खेळ सुरू होतो. नाव ओळखणे, नंदीबैल नाचवणे, पाऊस पडेल की नाही अशा अनेक प्रश्नांची मान हलवून होकार - नकारार्थी विचारणा करणे असा खेळ सादर केला जातो. त्यातून लोक खुश झाल्यावर शंभर दोनशे रुपये या कलाकारांना मिळतात. वाडी वस्तीवर पसा पसा धान्य देऊन नवीन जुनी कपडे देऊन त्यांच्या कलेला सन्मानाची वागणूक दिली जाते. गावा बाहेर माळरानावर पाल टाकून ही मंडळी गावोगाव भटकंती करताना दिसतात. दारोदार भटकंती करत नंदीबैला सोबत चार पाचच्या संखेत ही कलाकार मंडळी नंदीबैला सोबत फिरताना दिसतात. चार पाच पिढ्यांपासून हा व्यवसाय सुरू आहे. आजही लोक सन्मानाने वागणूक देऊन खेळ पाहून काहितरी देतात. पण दुष्काळी परिस्थिती तसेच शिक्षण नसल्याने या खेळावर उपजिविका भागात नाही. वंश परंपरागत म्हणून पोटाला चिमटा काढत सुगी नंतरच काहितरी धान्य मिळते, अशी भावना वाघवाडी येथिल नंदीबैलवाले सुरेश देशमुख यांनी सांगितले.